**मुंबई विद्यापीठ** **अत्यंत महत्वाचे**

क्र.वि.क./१९० /२००९

परिपत्रक

प्राचार्य/ संचालक, संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, व्यवस्थापन, अभियांत्रीकी, औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालये (अल्पसंख्यांक महाविद्यालय वगळून) यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

दिनांक : ३ जुन, २००९
स्थळ : मुंबई.

प्राचार्य कृ. व्यंकटरमणी
कुलसचिव

---

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: बीसीसी/२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ११ मे, २००९.

**विषय: - विद्यापीठाच्या मागासवर्ग कक्षाने त्यांच्या अखत्यारीतील शाळा/महाविद्यालये यांच्या बिंदुनामावल्या तपासून दिल्यानंतर त्यास अंतिम मान्यता सहाय्यक आयुक्त मा.व.क यांचेकडून घेणेबाबत.**

महोदय,

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शासनाने मागासवर्गीयांच्या सरळसेवा व पदोन्नतीमधील आरक्षणाची योग्य प्रकारे अंमलबजावणी होणेसाठी वेळोवेळी शासननिर्णयाव्दारे अथवा परिपत्रकाव्दारे सुचना निर्गमित केल्या आहेत. तथापी असे असतानाही याकडे दुर्लक्ष करुन मागासवर्गीयांसाठीची राखीव पदे खुल्या प्रवार्गातून भरली जात आहेत. जेथे छोटे संवर्ग आहेत तेथे सरळसेवा व पदोन्नतीव्दारे पदे भरताना ती मागासप्रवर्गामध्ये रोटेशन व्दारे भरावयाची आहेत. जर कोणत्याच मागासप्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध होत नसल्यास अशी पदे तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षीत करुन खुल्या प्रवर्गातून शासनाच्या पुर्व मान्यतेने भरावयाची आहेत. याकडे दुर्लक्ष करुन अशी रिक्त पदे कायमस्वरुपी एकाच प्रवर्गातून वारंवार भरली जात आहेत. यामुळे इतर मागास घटकांवरती अन्याय होत आहे अथवा, मागासप्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध नाही म्हणून परस्पर अनारक्षीत करुन खुल्या प्रवर्गातून भरली जात आहेत. विद्यापीठाअंतर्गत कार्यरत असलेल्या मागासवर्ग कक्षाकडून बिंदुनामावल्या तपासून देताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार बिंदुनामावल्या तपासून देणे अपेक्षित आहे. तथापी असे न करता बिंदुनामावल्या तपासून देताना शासन निर्णयांचा चुकीचा अर्थ लावून बिंदुनामावल्या तपासून दिल्या जात आहेत. अशा प्रकारच्या तक्रारी ह्या विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत.

२) शासनाकडे याअनुषंगाने ब-याच कर्मचा-यांनी/संघटनांनी भेटून तक्रारी दाखल केल्या आहेत. वास्तव आता सर्व विद्यापीठांना याव्दारे कळविण्यात येते की, बिंदुनामावल्या तपासून देण्याच्या कार्यपध्दतीमधे एकवाक्यता राहण्यासाठी त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा/महाविद्यालये यांच्या बिंदुनामावल्या विद्यापीठाअंतर्गत कार्यरत असलेल्या मागासवर्ग कक्षाकडून प्रथम तपासून घेण्याची कार्यपध्दती चालूच ठेवावी. तथापी या बिंदुनामावल्यांना संबंधित सहाय्यक आयुक्त (मा.व.क) यांचेकडून सहा महिन्याच्या आत अंतिम मान्यता घेण्यात यावी. यापूर्वी विद्यापीठाअंतर्गत कार्यरत असलेल्या मागासवर्ग कक्षाने ज्या बिंदुनामावल्या तपासून दिल्या आहेत त्यांना सुध्दा सहाय्यक आयुक्त (मा.व.क.) यांचेकडून अंतिम मान्यता घेण्याची कार्यवाही सहा महिन्याच्या आत पूर्ण करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या विभागास सादर करावा.

३) सदर पत्र महाराष्ट्र शासनाच्य वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००९०५१११३१५४७००१ असा आहे.

आपला,

सही/-
(गो.आ.लोखंडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.